दैनिक
महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS LAT SWITCHGEAR INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक २५९ वा बुधवार दि.२० मार्च २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

आणखी एक ठाकरे चोरण्याचा प्रयत्न; उद्धव ठाकरेंची भाजपावर घणाघाती टीका

यवतमाळ : लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने राज्यात सध्या वेगवान घडामोडी घडत आहेत. एकीकडे जागावाटपावरुन महायुतीमध्ये तिढा निर्माण झालेला असताना राज ठाकरेंच्या निमित्ताने नवा पक्ष सामील होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज ठाकरे यांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह भाजपा नेत्यांच्या भेटीगाठी घेतल्या असून लवकरच युतीसंबंधी निर्णय होण्याची शक्यता आहे. दरम्यान यावरुन उद्धव ठाकरे यांनी भाजपावर टीका केली असून आणखी एक ठाकरे चोरण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला आहे.महाराष्ट्रात मतं हवी असतील तर मोदी नाही तर ठाकरे नावावरच मतं मिळतात हे आता त्यांना समजलं आहे अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी भाजपावर निशाणा साधला आहे. ते यवतमाळ येथील आयोजित सभेत बोलत होते. यावेळी त्यांनी समर्थकांना फक्त जल्लोषात राहू नका, तर प्रयत्न करा असा कानमंत्रही दिला.काय म्हणाले उद्धव ठाकरे? अस्सल बियाणं भाजपातच नाही तर शेतक–यांना काय देणार. यांचं सगळं बियाणं बोगस आहे, सगळी माणसं बाहेरुन घेत आहेत.

महाराष्ट्रात मतं हवी असतील तर मोदी नाही तर ठाकरे नावावरच मतं मिळतात हे आता त्यांना समजलं आहे. म्हणून बाळासाहेबांचा फोटो चोरला. आता आणखी एक ठाकरे चोरण्याचा प्रयत्न करत आहेत. घेऊन जा, मला फरक पडत नाही. मी आणि माझी जनता समोरासमोर आहोत इतकं पुरेसं आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले आहेत.दरम्यान यावेळी त्यांनी कार्यकर्ते, समर्थकांना निवडणूक जिंकण्यासाठी प्रयत्न करण्याचा सल्ला दिला. नुसतं जल्लोषात राहू नका. प्रयत्न केल्याशिवाय आपण जिंकू शकत नाही. जमिनिची मशागत केल्याशिवाय पीक येत नाही. तसंच निवडणुकीच्या दिवसापर्यंत सगळ्या विचारांची पेरणी, मोदी सरकारच्या थापा जनतेपर्यंत पोहोचवा. इतकं केल्यानंतर मी प्रचाराला आलो नाही तरी आपला उमेदवार प्रचंड मताने जिंकेल असा विश्वास आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले आहेत.मनसेला दोन जागा मिळण्याची शक्यता दरम्यान सूत्रांच्या माहितीनुसार, महायुतीमध्ये मनसेला दोन लोकसभेच्या जागा मिळण्याची शक्यता आहे. दक्षिण मुंबई आणि शिर्डी या दोन लोकसभेच्या जागा मनसेला दिल्या जाऊ शकतात. विशेष म्हणजे या निवडणुकीतून अमित ठाकरे रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. यामागे भाजपाचा आग्रह कारणीभूत ठरु शकतो.दक्षिण मुंबईतून तरुण आणि सुशिक्षित चेहरा असावा यासाठी अमित ठाकरे यांनी निवडणूक लढवावी असा भाजपचा आग्रह आहे. राज ठाकरे यांनी मात्र या मागणीवर काय प्रतिक्रिया दिली आहे हे समजू शकलेलं नाही. पण तसं झाल्यास अमित ठाकरे निवडणूक लढताना दिसतील. दरम्यान शिर्डीमधून मनसेचे नेते बाळा नांदगावकर उमेदवार असू शकतील.

नाराजी नाट्यातून मोदी सरकारच्या मंत्र्यांचा राजीनामा

नवी दिल्ली: राष्ट्रीय लोक जनशक्ती पक्षाचे प्रमुख पशुपती कुमार पारस यांनी मोदी सरकारमधील मंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. आपल्यावर अन्याय झाल्याचे कारण देत त्यांनी केंद्रीय मंत्रीपदाचा राजीनामा दिला. बिहारमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या जागा वाटपात भाजपने चिराग पासवान यांच्या गटाला झुकते माप न दिल्यामुळे डावलले गेल्याची भावना झाल्याने पशुपतीकुमार पारस यांनी राजीनामा दिला आहे. पीएम मोदींच्या नेतृत्वाचे पशुपतीकुमार यांच्याकडून कौतुक बिहारमधील जागा वाटपानंतरच्या नाराजी नाट्याच्या पार्श्वभूमीवर पशुपतीकुमार पारस यांनी आज (दि.१९) दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन राजीनाम्याची घोषणा केली. आमच्यावर अन्याय झाला आहे, त्यामुळे मी केंद्रीय मंत्रिपदाचा राजीनामा देत असल्याचे ते म्हणाले. सोबत, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर पशुपतीकुमार पारस यांनी स्तुतीसुमने उधळली. ते म्हणाले, की मी अत्यंत प्रामाणिकपणे देशाची सेवा केली आणि आजही मी पंतप्रधानांचा आभारी आहे. पंतप्रधान मोदी हे महान नेते आहेत. आमचे पाच खासदार असून, एनडीएमधील जागावाटपानंतर पुढील निर्णय घेतला जाईल; असे आपण आधीच सांगितले होते. त्यामुळे आपण राजीनामा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पाठवला असल्याचे पशुपती पारस म्हणाले. भाजप १७ तर संयुक्त जनता दल १६ जागांवर लढणार भाजपने काल बिहारमधील जागा वाटपावर शिक्कामोर्तब करताना चिराग पासवान यांच्या लोकजनशक्ती पक्षाला (रामविलास गट) पाच जागा सोडल्या आहेत. बिहारमध्ये भाजप १७ तर संयुक्त जनता दल १६ जागांवर लढणार आहे. याखेरीज जीतनराम मांझी यांचा अवाम मोर्चा (धर्मनिरपेक्ष), उपेंद्र कुशवाह यांचा राष्ट्रीय लोक मोर्चा प्रत्येकी एक जागा लढणार आहेत. यात पशुपतीकुमार पारस यांना एकही जागा सोडण्यात आली नसल्याने वाढलेल्या अस्वस्थेतून त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. दरम्यान, राष्ट्रीय जनता दलाने पशुपतीकुमार पारस यांना विरोधकांच्या आघाडीत येण्याचा प्रस्ताव दिल्याचेही सांगितले जात आहे.

कवी- साहित्यिक उत्तम तरकसे यांचा मुंबई विक्रोळी टागोर नगर येथे गुणगौरव समारंभ संपन्न

International Human Rights Seva Parishad, Maharashtra
AAPLE
ADARSH MUMBAI FOUNDATION

मुंबई :- मुंबई (विक्रोळी) टागोर नगर येथे आदर्श मुंबई फाउंडेशनच्या वतीने नॅशनल एसक्लोजनस स्टार अवॉर्ड २०२४ ने नवी मुंबईची शान कवी – साहित्यिक मा. श्री उत्तम दा. तरकसे यांना महाराष्ट्र राज्य शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले त्याबद्दल मुंबई टागोर नगर विक्रोळी येथे आदर्श मुंबई फाऊंडेशनच्या वतीने नॅशनल एसक्लोजन्स स्टार अवॉर्ड २०२४ ने सन्मानपूर्वक गौरवण्यात आले व त्यांचे सदर कार्यक्रमात हार्दिक अभिनंदन करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या वेळी विचार मंचावर डॉ. शुक्रोजी खांडेकर (दै. नवशक्ती वृत्तपत्र संपादक), सौ. आरती ताई बनसोडे (सउपदेशिका), व भालचंद्र पाटे (वृत्तपत्र विक्रेता महासंघ महाराष्ट्र राज्य अध्यक्ष), असे प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमास हजर होते सदर कार्यक्रमास खूप मोठ्या प्रमाणात प्रेक्षक वर्ग सुद्धा हजर होता.

श्री राधाकृष्ण मंदिर विकासासाठी कोट्यावधीचा निधी मंजूर; आ. कराड यांचे गातेगाव येथील ग्रामस्थांनी मानले आभार

लातूर : – लातूर तालुक्यातील मौजे गातेगाव येथील श्री राधाकृष्ण मंदिर विकास कामासाठी ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेतून तब्बल २ कोटी आणि पर्यटन विकास योजनेतून २० लाख यासह विविध योजनेतून मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांचे गातेगाव येथील ग्रामस्थांनी यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील मौजे गातेगाव येथे परमपूज्य विद्यानंदजी सागर महाराज यांच्या आध्यात्मिक कार्यातून श्री राधाकृष्ण आध्यात्म आश्रम कार्यरत आहे. या राधाकृष्ण मंदिर परिसराचा विकास व्हावा सोई सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. गिरीशजी महाजन साहेब यांच्याकडे भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला आ. कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे गातेगाव येथील श्री राधाकृष्ण मंदिर परिसरात भक्तनिवास बांधकाम करणे, सिमेंट कॉंक्रीट रस्ता

व नाली बांधकाम करणे, मंदिर संरक्षण भिंत बांधकाम करणे, पाण्याची टाकी व पाईपलाईन आदी विकास कामाकरिता तब्बल २ कोटी रुपयाचा निधी गेल्या १३ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयानूसार राज्याच्या ग्रामविकास विभागाअंतर्गत ब वर्ग ग्रामीण तीर्थक्षेत्राच्या विकास योजनेतून मंजूर झाला आहे. त्याचबरोबर जिल्हा पर्यटन विकास योजने अंतर्गत मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक कामासाठी २० लाखांसह गातेगाव येथील गावांतर्गत विविध कामांना आमदार रमेशअप्पा कराड यांनी मोठ्या प्रमाणात निधी मिळवून दिला.

गातेगाव येथील विविध विकास कामासाठी गावच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढा मोठा निधी मिळाल्याने भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांचा जाहीर सत्कार करून ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले यावेळी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी व्हाईस चेअरमन नाथसिंह देशमुख, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, गातेगाव येथील सरपंच नागनाथ बनसोडे, उपसरपंच ज्ञानेश्वर जुगल, ग्रामपंचायतचे सदस्य अमित जावळे सोसायटीचे सदस्य विनायक धावारे, शिवरुद्र चौंडे, श्याम माळी, बालाजी गवळी, सुरेश सूर्यवंशी यांच्यासह गातेगाव आणि परिसरातील नागरिक, भाजपा कार्यकर्ते, भाविक भक्त उपस्थित होते.

औसा पाणीपुरवठा योजना व जलकुंभचा शुभारंभ

औसा :- औसा शहरात विशेषत शहराच्या नवीन हदवाढ भागांमध्ये आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नातून केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत औसा पाणीपुरवठा योजना व जलकुंभ बांधकाम चा शुभारंभ पार पडला. अंदाजपत्रकीय रक्कम ४३.०४ कोटी रुपये इतकी खर्च करून ही योजना शहरांमध्ये कार्यान्वित होणार आहे ज्यामुळे शहराच्या नवीन हद्द वाढ भागातील नागरिकांना पाण्याअभावी होणारी भटकंती दूर होणार आहे याप्रसंगी कामाचे रितसर शुभारंभ तालुक्याचे लोकप्रिय आमदार ही अभिमन्यू पवार, जिल्हा प्रभारी श्री संतोष आप्पा मुक्ता, तालुका अध्यक्ष श्री सुभाष जाधव, माजी नगराध्यक्ष श्री किरण उटगे, माजी नगरसेवक तथा शहराध्यक्ष श्री सुनिल उटगे तसेच औसा नगरपालिकेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक श्री अजिंक्य रणदिवे यांच्या उपस्थितीमध्ये औसा येथे पार पडले या योजनेमध्ये शहरातील नवीन वस्तीमध्ये पाईपलाईन ची सुविधा आहे तसेच यामध्ये नवीन जलकुंभचा ही समावेश आहे.

संभाजी महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

मुरूड/महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा समारोप समारंभ दि १९.०३.२०२४ रोजी उत्साहात संपन्न झाला. समारोप समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून मुरुड पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मा. व्यंकटेश आलेवार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज जागृती शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. देवकर डी.बी. होते. तर समाज जागृती शिक्षण संस्थेचे सचिव मा.ॲड.विजय पाटील, समाज जागृती शिक्षण संस्थेचे संचालक मा. फुलचंद हिंगले, दैनिक पुण्यनगरीचे पत्रकार मा.शरद धाबेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक काळम यांची प्रमुख उपस्थिती होती.

संभाजी कॉलेज, मुरुड
पारितोषिक वितरण व समारोप समारंभ

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. व्यंकटेश आलेवार बोलताना म्हणाले की, आजचा विद्यार्थी हा उद्याचे भविष्य आहे हे भविष्य जर उज्वल पद्धतीने घडवायचे असेल तर आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर अत्यंत काळजीपूर्वक करावा. पुढे बोलताना मा.आलेवार म्हणाले की, आई वडिलांचे संस्कार विसरू नका तुमच्यामुळे त्यांची मान समाजात खाली जाईल असे कधीही वागू नका. सजग नागरिक बना. यावेळी दैनिक पुण्यनगरीचे पत्रकार मा.शरद धाबेकर यांनी आपले महाविद्यालयीन प्रसंग सांगून कार्यक्रमास रंगत आणली. अध्यक्षीय भाषणात मा.ॲड.विजय पाटील म्हणाले की, महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या पंखाला बळ देऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करेल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा विभाग प्रमुख प्रा.मधुकर क्षीरसागर यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अशोक काळम यांनी केले तर आभार प्रा. डॉ. कानडे ए.एस यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्नेहसंमेलन प्रसिद्धी विभाग प्रमुख प्रा. डॉ. बिडवे एम.एस., स्नेहसंमेलन नियोजन समितीतील प्रा. मधुकर क्षीरसागर, प्रा. डॉ.बी.एम.गोरे, प्रा. डॉ. एस.एन.उबाळे, प्रा. डॉ भगत जी. एम. यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

संपादकीय....

स्वागतम्... नवमतदार राजा!

जगातील सर्वात मोठी लोकशाही असणार्या भारत देशाचा सार्वजनिक उत्सव म्हणजे लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी नुकताच निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. 'चुनाव का पर्व देश का गर्व' ही निवडणूक आयोगाची नीती आहे. त्याचबरोबर माझे पहिले मत देशासाठी ही टॅग लाईन आहे. तुमच्या आमच्यासारखे सामान्य मतदार देशात जो काय प्रचार सुरू आहे, तो बारकाईने पाहत मनोरंजन करून घेत आहोत. मतदानापासून कोणीही वंचित राहू नये म्हणून निवडणूक आयोग यावर्षी अनेक नवीन संकल्पना राबवत आहे, त्याचे कौतुक केल्यावर वाचून राहवत नाही.तरुण मतदारांना उत्साह येण्यासाठी त्यांची नोंदणी करून घेण्याची प्रक्रिया गेली दोन वर्षे सुरु आहे. प्रत्येक राज्यात यावर्षी लाखो मतदार नव्याने आणि पहिल्यांदाच मतदान करणार आहेत. नव्या नवलाईचे प्रत्येकाला कौतुक असते. त्या मतदान केंद्रांवरील रांगा, त्यात शिस्तीत उभे राहून केंद्रात जाऊन आपल्याला पाहिजे त्या उमेदवारासमोरचे बटन दाबणे, त्यापूर्वी तर्जनीवर निळी शाई लावून घेणे, मतदान पूर्ण करून मतदान केंद्राच्या २०० मीटरबाहेर आल्याबरोबर तर्जनी दाखवून सेल्फी काढणे आणि तो तत्काळ सोशल मीडियावर पोस्ट करणे हा उत्साह तरुणांमध्ये यावर्षी दिसून येणार आहे. शिवाय सकाळपासून सोशल मीडियावर मी मतदान केले, तुम्ही केले का, अशी विचारणा करणारे असंख्य फोटो दिसणार आहेत. एकंदरीत काय की, मतदानाची टक्केवारी वाढणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सोशल मीडियाच्या प्रचारामुळे तरुणांकडून उत्साहाने मतदान होईल, यात काही शंका नाही. काहीच नाही, तर सोशल मीडियावर फोटो टाकायला मिळण्याची एक संधी म्हणूनही बरेच तरुण-तरुणी मतदानाला येतील आणि मतदानही करतील. जे काय कारण असेल ते असो, पण प्रत्येकाने मतदान करणे आवश्यक आहे, हा मेसेज मात्र आता बर्यापैकी सर्वत्र पोहोचला आहे.भारतामध्ये आयुर्मान बर्यापैकी वाढल्यामुळे ८०, ८२, ८५ यापेक्षा जास्त वयाचे मतदार असतात. त्यांच्यासाठी निवडणूक आयोगाने वेगळी तरतूद केली आहे. मतदान केंद्रापर्यंत येऊ शकत नाहीत, असे ज्येष्ठ नागरिक असोत की अपंग व्यक्ती असोत, त्यांच्यासाठी आयोगाचे कर्मचारी त्यांच्या घरी जाऊन त्यांच्याकडून फॉर्म भरून घेऊन तो सीलबंद लिफाफ्यात स्वीकारून त्यांचे मतदान करून घेणार आहेत. यांची संख्याही यावर्षी भरपूर असणार आहे. त्यामुळे तरुणाईबरोबरच वयोवृद्ध आणि अपंग यांची मतदान टक्केवारी वाढणार आहे आणि ही लोकशाहीसाठी चांगलीच घटना आहे.आता तुम्ही केवळ मतदानासाठी बाहेर पडायचे आहे. वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये मतदान होत असल्यामुळे आपल्या लोकसभा मतदारसंघाचे मतदान किती तारखेला आहे, हे पाहून तुम्ही फक्त मतदान करण्याचे निश्चित करायचे आहे. तुम्हाला तहान लागली तर स्वच्छ आणि थंडगार पाणी मतदान केंद्रावर आहे. कुणाला चक्कर आली किंवा इतर काही त्रास झाला तर प्रथमोपचार पेट्या मतदान केंद्रावर आहेत. तुम्हाला चालता येत नसेल तर कर्मचारी लोक तुमच्या घरी येऊन मतदान करून घ्यायला तयार आहेत. एकंदरीत मतदारांचे स्वागत करण्याची आणि व्यवस्था करण्याची सर्व तयारी निवडणूक आयोगाने केलेली आहे.

चांदवडचे शेतकरी महिला अधिवेशन

सतीश कामत काँग्रेस नेते यांची 'भारत जोडो न्याय यात्रा' गेल्या गुरुवारी नाशिकजवळील चांदवडमध्ये पोहोचली. त्या निमित्त 'योद्धा शेतकरी' शरद जोशी यांनी एके काळी याच चांदवडमध्ये घेतलेल्या शेतकरी महिला अधिवेशनाचे स्मरण.अलीकडच्या काळात नाशिक जिल्हा तिथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयांमुळे राष्ट्रीय पातळीवर जास्त प्रसिद्ध झाला असला तरी सुमारे ४० वर्षांपूर्वी हा जिल्हा शेतकरी आंदोलनाचं मोठं केंद्र होतं. शेतकरी संघटनेचे नेते कै. शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या पहिल्या ऊस आंदोलनामध्ये या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी केवळ सहभाग नोंदवला नाही, तर रक्तही सांडलं. अशा या जिल्ह्यात काँग्रेसचे अध्यक्ष राहुल गांधी यांची 'भारत जोडो न्याय यात्रा' गेल्या गुरुवारी पोहोचली त्यानिमित्त आयोजित मेळाव्यात शेतकरी आणि कांद्याच्या बाजारपेठेचा प्रश्न केंद्रस्थानी होता.या चांदवड शहराला शेतकरी संघटनेच्या दृष्टीने आणखी ऐतिहासिक महत्त्व आहे. ते म्हणजे, १९८६ साली याच गावात शेतकरी संघटनेतर्फे देशातलं पहिलं शेतकरी महिला अधिवेशन आयोजित करण्यात आलं. त्याला सुमारे २५ हजार महिलांनी हजेरी लावली आणि अधिवेशनाच्या समारोपप्रसंगी हा आकडा एक लाखापर्यंत गेला. हे विराट अधिवेशन शेतकरी संघटनेच्या इतिहासातला एक मैलाचा दगड ठरला. त्यातूनच पुढे जोशी यांनी 'लक्ष्मी मुक्ती', 'सीता शेती' यासारखे शेती व्यवहारात स्त्रियांचा हक्क प्रस्थापित करणारे अभिनव उपक्रम सुरू केले आणि त्यांना अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.चांदवड येथील नेमिनाथ जैन विद्यालयाच्या प्रांगणावर ९ ते १० नोव्हेंबर १९८६ हे दोन दिवस अधिवेशन झालं. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचं चांदवडशी असलेलं नातं लक्षात घेऊन अधिवेशन परिसराला त्यांचं नाव दिलं होतं आणि केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे, तर बिहार, मध्य प्रदेश, पंजाब, हरियाणा, गुजरात, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक या राज्यांमधूनही काही महिला प्रतिनिधी या अधिवेशनामध्ये सहभागी झाल्या. विदर्भातील बऱ्याच शेतकरी महिला ६-७ नोव्हेंबरलाच घरची चटणी- भाकरी बांधून चांदवडला हजर झाल्या. नोव्हेंबर महिना असल्याने थंडी कडाक्याची होती. अधिवेशनाच्या आदल्या संध्याकाळी मैदानात काही ठिकाणी रात्रीच्या भाजी-भाकरीसाठी चुली पेटल्या होत्या आणि संघटनेकडून गादी-गिरद्यांची काही अपेक्षा न ठेवता, जेवणानंतर अनेकजणी तिथेच निवांतपणे झोपी गेल्या. संघटनेकडून प्रवासखर्च सोडाच, राहण्या-जेवण्याचीसुद्धा फार व्यवस्था नसूनही हजारो महिला आल्या होत्या. आजच्या काळात याची कल्पनासुद्धा करता येणार नाही.दुपारी बरोबर दोन वाजता खुलं अधिवेशन सुरू झालं. व्यासपीठाच्या पडद्यावर एका पाठुंगळी लहान मुलगी आणि हातात खुरपं घेतलेल्या शेतकरी महिलेचं चित्र. आयुष्याची लढाई लढत असलेली झाशीची राणीच जणू! 'किसानांच्या बाया आम्ही, शेतकरी बाया,' हे साने गुरुजींचं गीत आणि 'डोंगरी शेत माझं ग, मी बेणू किती, आलं वरीस राबवलं, मी मरावं किती' ही प्रसिद्ध कवी कै. नारायण सुर्वे यांची कविता महिलांनी समूह स्वरात गायली आणि सगळं वातावरण भारून गेलं. शेतकरी महिला अधिवेशनात हे गाणं म्हटलं गेलं, 'हा कवी म्हणून माझ्या आयुष्यातला सर्वोच्च आनंदाचा क्षण होता' असं सुर्वे यांनी नंतर एका प्रकट मुलाखतीत म्हटलं होतं. काही महिला कार्यकर्त्यांच्या भाषणांनंतर शरद जोशी यांचं भाषण झालं. त्यामध्ये त्यांनी ग्रामीण भागात वाढलेली गुंडगिरी आणि महिलांवरच्या अत्याचारांचा उल्लेख करत स्थानिक पातळीवरची सत्ता महिलांच्या हाती दिली तर याला आळा बसेल, असं प्रतिपादन केलं आणि आगामी निवडणुकीत शेतकरी संघटना ग्रामीण भागातील निवडणुकांमध्ये फक्त महिला उमेदवार उभे करेल किंवा अन्य महिला उमेदवारांना पाठिंबा देईल, अशी घोषणा केली. भावी वाटचालीच्या दृष्टीने अधिवेशनातला हा एक महत्त्वाचा निर्णय होता. संघटनेच्या आर्थिक अडचणींबाबतही जोशी आपल्या भाषणात बोलले. त्याला प्रतिसाद म्हणून अधिवेशनाला उपस्थित एका महिलेने स्वत:कडचा सोन्याचा दागिना जोशींना देऊ केला. पण, मी स्त्री-धन घेत नाही, असं सांगून त्यांनी तो नम्रपणे परत केला. शेतकरी महिलांचे कष्ट कमी करण्याची मागणी करणारे ठराव अधिवेशनात मंजूर करण्यात आले. जोशींनी भाषणात घोषणा केलेल्या, निवडणुका लढवण्याच्या निर्णयाचाही त्यामध्ये समावेश होता. अधिवेशनाच्या अखेरीला सर्व उपस्थितांनी स्त्रियांच्या सन्मानाचा उद्घोष करणारी प्रतिज्ञा घेतली.अधिवेशन संपल्यावरही अनेकजणी त्या परिसरात

रेंगाळत होत्या. असं मुक्तपणे व्यक्त होणं त्यापैकी अनेकजणी कदाचित प्रथमच अनुभवत होत्या. एकमेकींच्या गळयात पडून निरोप घेताना पुढल्या कार्यक्रमाची आठवण करून देत होत्या. अनेक महिला जोशींचा निरोप घेण्यासाठी भेटत होत्या. त्या सर्वजणी त्यांना 'भाऊ' म्हणून संबोधत होत्या. गमतीचा भाग म्हणजे, बहुतेक महिलांचे पतीराजही शेतकरी संघटनेचे सदस्य होते. ते जोशींचा उल्लेख नेहमी 'साहेब' असा करायचे. पण या महिलांसाठी जोशी 'भाऊ' बनले होते. कारण त्यांच्या आयुष्यातलं दु:ख, वेदना जोशींनी अचूक टिपल्या होत्या आणि त्यांना वाचा फोडण्यासाठी व्यापक व्यासपीठ निर्माण करून दिलं होतं. शेतकरी संघटना आता केवळ राज्यातल्या पुरुष शेतकऱ्यांची संघटना राहिली नव्हती. एका कुटुंबाची संघटना बनली होती.हे अचानक घडलं नव्हतं. तसं पाहिलं तर भारतात आल्यानंतर जोशींनी सुरुवातीच्या काळात स्थानिक पातळीवर काही आंदोलनं केली. त्यामध्ये वांद्रे ते चाकण हा ६४ किलोमीटर लांबीचा पक्का रस्ता व्हावा, या मागणीसाठी त्या भागातील शेतकऱ्यांचा 'लाँग मार्च' काढला होता. त्यामध्ये महिलाही सहभागी झाल्या होत्या शिवाय त्यानंतर झालेल्या कांदा, ऊस, तंबाखू इत्यादी पिकांच्या हमीभावाच्या आंदोलनातही महिलांचा लक्षणीय सहभाग होता. १९८२ मध्ये सटाण्याला झालेल्या पहिल्या शेतकरी अधिवेशनात शेतकरी स्त्रियांच्या प्रश्नावर एक स्वतंत्र सत्र आयोजित करण्यात आले आणि तिथून शेतकरी महिलांना स्वतंत्र स्थान देण्याच्या धोरणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. चांदवडच्या अधिवेशनापूर्वीही काही ना काही निमित्ताने शेतकरी महिलांच्या छोटया बैठका, प्रशिक्षण शिबिरं होत होती. महिलांनी अधिवेशनाला यावं म्हणून स्वत: जोशी यांच्यासह संघटनेच्या काही प्रमुख महिला कार्यकर्त्यांनी राज्याच्या ग्रामीण भागात खेडोपाडी फिरून प्रचार आणि नियोजन केलं होतं. अलीकडच्या काळात चाललेली शेतकरी आंदोलनं पाहिली तर सुमारे ३५-४० वर्षांपूर्वी जोशींच्या शेतकरी संघटनेची आंदोलनं किंवा या महिला अधिवेशनासारखा उपक्रम संयोजन, संघटन कौशल्याच्या दृष्टीने अचंबित करणारे आहेत. कारण त्या काळात प्रचाराची, संपर्काची साधनं खूपच कमी होती. शिवाय, शेतकरी संघटनेची आर्थिक ताकदही फारशी नव्हती. पण जोशींच्या विचाराने भारावलेल्या कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण झाली होती. संघटनेच्या पाच-सहा वर्षांच्या वाटचालीत झालेल्या या पूर्वतयारीने महिला अधिवेशन यशस्वी करण्यात मोलाचा हातभार लावला.अधिवेशनाहून परत येत असताना नाशिकमध्ये काँग्रेसचे माजी मंत्री कै. विनायकराव पाटील यांची सहज भेट घेतली. गप्पांमध्ये महिला अधिवेशनाचा विषय निघाला. त्यावर टिप्पणी करताना विनायकराव म्हणाले, 'यापूर्वी दोन व्यक्तींनी आमच्या घरातल्या महिलांना घराबाहेर पडण्यास उद्युक्त केलं. त्यापैकी एक होते, संत तुकडोजी महाराज आणि दुसरे शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे! या दोन्ही व्यक्तींबद्दल आमचा काही आक्षेप नव्हता. कारण तुकडोजी महाराज अध्यात्म सांगायचे, तर बाबासाहेब शिवचरित्र कथा! शरद जोशी ही तिसरी व्यक्ती आहे, जिने आमच्या घरातल्या महिलेला आपल्या हक्कांसाठी घराबाहेर पडण्यास उद्युक्त केलं आणि हा माणूस आमच्यासाठी जास्त धोकादायक आहे.' असं म्हणत ते नेहमीप्रमाणे मिश्किल हसले. या बोलण्यामध्ये राजकीय पदर होता, पण त्याचबरोबर जोशींच्या कर्तबगारीचं कौतुकही होतं. शेतकरी चळवळीतले एक बिनीचे शिलेदार कै. माधवराव खंडेराव मोरे हे विनायकरावांचे मामा. त्यामुळे त्याही बाजूने ते स्वत: चळवळीच्या पाठीशी होतेच.

या अधिवेशनापूर्वी १९८५ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत शेतकरी संघटनेने स्वत:चे उमेदवार उभे केले नव्हते. पण निवडणूक निकालावरून जोशींच्या असं लक्षात आलं की, एरवी आपल्या सभा-आंदोलनांना लाखोंनी गर्दी करणारे शेतकरी निवडणुकीच्या वेळी मात्र आपापल्या पक्षांच्या तंबूंचा आसरा घेतात. या महिला अधिवेशनाच्या निमित्ताने त्यांनी समाजातील उरलेल्या ५० टक्के मतदारांना आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला होता. कारण तोपर्यंत संघटनेचा राजकारणातील प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग उघड झाला होता. पुरुषांपेक्षा महिला जास्त कृतज्ञता बुद्धीच्या असतात, असंही एक निरीक्षण यामागे होतं. अधिवेशनानंतर काही दिवसांनी भेट झाली तेव्हा या 'छुप्या अजेंडया'बद्दल छेडलं असता जोशींनीही हसत हसत मूकपणे दुजोरा दिला.आपण दरवर्षी ८ मार्च रोजी महिला दिन उत्साहाने साजरा करत असलो तरी एरवी आर्थिकदृष्टया दुर्बल किंवा ग्रामीण भागातल्या महिलेची स्थिती तशी हलाखीचीच असते. या पार्श्वभूमीवर या महिला अधिवेशनाने राज्यातल्या शेतकरी महिलेला प्रथमच तिच्या स्वतंत्र अस्तित्वाची क्षमतेची जाहीर जाणीव करून दिली. त्यामुळे चांदवड हे तिच्यासाठी भौगोलिक नकाशावरचं गाव न राहता तिच्या सुप्त शक्तीच्या जागराचं केंद्र बनून राहिलं आहे.

उत्सवाची कथानके!

भारतात रामनवमीनंतर अवघ्या दोन दिवसांत सुरू होणाऱ्या 'लोकशाहीच्या मत-उत्सवा'शीही अशाच अनेक कहाण्या जोडल्या गेल्या आहेत.आपल्या देशात प्रत्येक उत्सवामागे एक कथा असते. काळाच्या ओघात त्या कथेत जसे बदल होत जातात, त्याचबरोबर त्यांना अनेक उपकथानकेही जोडली जात असतात.भारतात रामनवमीनंतर अवघ्या दोन दिवसांत सुरू होणाऱ्या 'लोकशाहीच्या मत-उत्सवा'शीही अशाच अनेक कहाण्या जोडल्या गेल्या आहेत. त्या अर्थातच राजकीय नेत्यांनी रचलेल्या आहेत; मात्र, या उत्सवाचे खरे मानकरी असलेल्या मतदारांच्या मनात नेमकी कोणती कहाणी आहे, त्याचा कौल या उत्सवाच्या सांगता सोहळ्यात मिळणार आहे.खऱ्या अर्थाने या उत्सवाची कथा गेल्या जानेवारीत अयोध्येतील बहुप्रतिक्षित राम मंदिरात 'रामलल्ला'ची प्रतिष्ठापना झाली, तेव्हाच रचली गेली, असे समजले जाते. मात्र, या कथानकास प्रदीर्घ अशी पार्श्वभूमी आहे आणि त्यावरच लागोपाठ तिसऱ्यांदा लोकसभेत निखळ बहुमत मिळवून विजयाची 'हॅटट्रिक' साधू इच्छिणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या घोडदौडीची कहाणीही दडलेली आहे.२०१४ नंतर भाजपच्या अश्वमेधाचा घोडा विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील भारतात इतक्या वेगाने दौडू लागला की, त्यामुळे काँग्रेससारख्या एकेकाळच्या बलाढ्य पक्षाचे सारे गड-किल्लेही ढासळून पडले. त्यामागे दडलेल्या राजकीय प्रवासाची कहाणीही या उत्सवात सामील आहे.अर्थात, या उत्सवाचा पहिला अध्याय शनिवारी निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर करून रचला. तेव्हाचे मुख्य निवडणूक आयुक्तांचे 'प्रवचन' हे साहित्यगुणांनी जसे नटलेले होते, त्याचबरोबर त्यात 'नैतिकता' आणि 'सर्वांना समान संधी' वगैरे बाबीही अंतर्भूत होत्या. शिवाय, या निवडणुकीत धार्मिक मुद्दे आणू नयेत, असे भाष्यही त्यांनी केले.त्यामुळेच मतदारांच्या मनात मग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबरच सर्वच राजकीय पक्षांचे नेते विविध मंदिरात जाऊन पूजाअर्चा का करत आहेत, असा प्रश्नही उभा राहू शकतो. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करणेच प्राप्त परिस्थितीत इष्ट ठरेल; कारण त्यापेक्षा अन्य कहाण्या या अधिक महत्त्वाच्या आहेत.एकीकडे 'रामलल्ला'च्या प्राणप्रतिष्ठेचा उत्सव जोमाने साजरा करतानाच, भाजपने देशाच्या गेल्या दहा वर्षांत झालेल्या विकासाची कहाणीही 'सब का साथ, सब का विकास!' अशी त्यास जोड देत रचली आहे. भारताच्या उत्तरेकडे असलेल्या पृथ्वीवरील नंदनवनास स्वातंत्र्यानंतर देण्यात आलेला खास दर्जा नरेंद्र मोदी सरकारने रद्दबातल करून एक मोठे पाऊल उचलले आहे आणि त्याचवेळी समान नागरी कायदा अमलात आणण्याच्या दृष्टीनेही पावले उचलली जाऊ लागली आहेत, असेही भाजपची कहाणी सांगत आहे.मात्र, विरोधकांची कहाणी नेमकी त्या विरोधातील आहे. भाजपने गेल्या दहा वर्षांत 'सब का साथ, सब का विकास' या आपल्या घोषणेच्या नेमकी विरोधातील पावले उचलली असून, देशातील काही मोजक्याच उद्योगपतींच्या

विकासाची कहाणी लिहिली असल्याचे राहुल गांधी सांगत आहेत. शिवाय, देशात गेल्या दहा वर्षांत विद्वेषाने कळस गाठल्यामुळे आपल्याला 'मोहब्बत की दुकान' उघडावे लागले, असा 'कहानी मे ट्विस्ट'ही ते आणू पाहत आहेत.भाजपच्या विरोधात एकत्र येऊन, भले 'इंडिया आघाडी' स्थापन करण्यात आली असली, तरी त्या आघाडीतील प्रत्येकाला आपलेच 'स्क्रिप्ट' पडद्यावर आणावयाचे आहे. त्यामुळे येत्या निवडणुकीत विरोधकांना गोळीबंद पटकथा लिहिताच आलेली नाही. या सगळ्या कहाण्यांना आणखी एक पदर आहे आणि तो घराणेशाहीचा आहे, तसाच बड्या नेत्यांच्या भ्रष्टाचाराच्या कहाण्यांचाही आहे.शिवाय, या कहाण्या राजकीय नेत्यांच्या बरोबरीने ईडी आणि अन्य तपासयंत्रणाही लिहित आहेत. त्यामुळे नायक कोण आणि खलनायक कोण, असा प्रश्न मतदारांच्या मनात उभा राहिला आहे. या पार्श्वभूमीवर मतदारांच्या मनात नेमक्या कोणत्या कहाण्या खदखदत आहेत, याकडे मात्र बड्या नेत्यांचे दुर्लक्ष होत आहे. मतदारांपैकी कोणाच्या मनात बेरोजगारीचा प्रश्न आहे तर कोणाच्या मनात महागाईचा.गावोगावचे शेतकरी शेतीचे अरिष्ट कधी संपणार याची वाट पाहत आहेत. राजकीय नेते आणि विविध पक्ष सांगत असलेल्या कहाण्यांपेक्षा ही कहाणी वेगळी असल्याचे दिसत आहे. मात्र, त्याची पर्वा कोणत्याच पक्षाला सध्या दिसत नाही. काही राजकीय नेते ही शेवटची निवडणूक आहे आणि नंतर घटनाच बदलली जाणार आहे, अशीही गोष्ट रचू पाहत आहेत. देशातील 'आम आदमी' मात्र स्वत:च्या व्यथांनी ग्रस्त आहे.भले, विकासाचा दर वाढल्याची कहाणी प्रसृत होत असली, तरी त्याच्या चिंता वेगळ्याच आहेत. या अशा अनेक कहाण्यांच्या पार्श्वभूमीवर या उत्सवात देशातील ९७ कोटी नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क निर्धाराने बजावायला हवा आणि या साऱ्या कहाण्यांतील नेमकी खरी कहाणी कोणती, याचे स्पष्ट उत्तर द्यायला हवे. तरच चार जूननंतर आपल्याला भविष्याची इष्ट दिशा सापडू शकेल.

शरीराच्या सर्वांगीण विकासासाठी झिंक आहे फायदेशीर,असा करा आहारात समावेश

निरोगी जीवनशैलीसाठी संतुलित आहार आणि नियमितपणे व्यायाम करणे आवश्यक आहे. या दोन्हींचा योग्य समतोल राखला की, शरीर निरोगी आणि सुदृढ राहण्यास मदत होते. सदृढ शरीरासाठी आपण आहारात जीवनसत्वे, प्रथिने, झिंक आणि इतर खनिजांचा समावेश करणे आवश्यक आहे.हे सर्व घटक आपल्या शरीराच्या सर्वांगीण विकास करण्यात महत्वाची भूमिका बजावतात. जर या पोषकघटकांची शरीरात कमतरता असेल तर, अनेक गंभीर समस्या उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पोषकघटकांपैकी एक असलेले झिंक हे आपल्या शरीराद्वारे संसर्गाशी लढण्यासाठी आणि पेशी तयार करण्यासाठी मदत करतात. जर शरीरात झिंकची कमतरता निर्माण झाली तर आरोग्याचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे, ही कमतरता भरून काढण्यासाठी तुम्ही आहारात काही खाद्यपदार्थांचा समावेश करणे महत्वाचे आहे. कोणते आहेत हे खाद्यपदार्थ? चला तर मग जाणून घेऊयात.दही दही हे आपल्या आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. दह्यामध्ये मुबलक प्रमाणात झिंक आढळून येते. त्यामुळे, शरीरातील झिंकची कमतरता भरून काढण्यासाठी तुम्ही आहारात दह्याचा समावेश करू शकता. दह्यामध्ये झिंकसोबतच प्रथिने, कॅल्शिअम आणि इतर पोषकघटक असतात. दह्याचे नियमितपणे सेवन केल्यास आपली पचनक्षमता सुधारण्यास मदत होते.हिरव्या पालेभाज्या हिरव्या पालेभाज्या आपल्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहेत. त्यामुळे, तर आपल्या सर्वांच्या आहारात हिरव्या पालेभाज्यांचा आवर्जून समावेश असतो. झिंकची कमतरता भरून काढण्यासाठी तुम्ही आहारात हिरव्या पालेभाज्यांचा समावेश जरूर करावा. पालक, मेथी, मटार, तांदूळसा इत्यादी भाज्यांमध्ये झिंकसोबतच इतर पोषकघटकांचे भरपूर प्रमाण आढळून येते. त्यामुळे, तुमच्या आहारात हिरव्या पालेभाज्यांचा जरूर समावेश करा.शेंगदाणे शेंगदाण्यांचा आपल्या रोजच्या दैनंदिन जीवनाशी अतिशय जवळचा संबंध आहे. आहारातील अनेक खाद्यपदार्थांमध्ये शेंगदाण्याचा वापर केला जातो. तसेच, शेंगदाण्यांचा वापर करून विविध प्रकारचे खाद्यपदार्थ बनवले जातात. आरोग्यासाठी फायदेशीर असणारे शेंगदाण्यांना झिंकचा उत्तम स्त्रोत म्हणून ओळखले जाते. या शेंगदाण्यांमध्ये झिंकसोबत लोह, जीवनसत्वे, व्हिटॅमीन ई, पोटॅशिअम आणि फायबरचे भरपूर गुणधर्म आढळून येतात. त्यामुळे, शरीराचा विविध आजारांपासून बचाव केला जातो.

लातूर तालुक्यातील ग्रामपंचायत लोकप्रतिनिधीना आयकार्ड द्यावे या मागणीस अखेर यश

युवा नेते विशाल कणसे यांची पंचायत समिती व जिल्हा परिषद याच्याकडे निवेदनाद्वारे मागणी व जिल्हा परिषद कडून पंचायत समिती कडे संबंधित लोकप्रतिनिधी यांना ओळखपत्र देण्यात यावे यासाठी अखेर पत्र ही देण्यात आले आहे .

मुरुड (प्रतिनिधी) लातूर तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालयात पदभार स्वीकारला पण या लोकप्रतिनिधीना आपण लोकप्रतिनिधी आहात याकरीता प्रशासनाने आयकार्ड द्यायला हवे पण गावचे सरपंच उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य हे गावातील जनता व शासन यातील दुवा म्हणून ओळखले जातात जोपर्यंत त्यांच्याकडे पदभार असतो तो पर्यंत ते गावचे कारभारी असतात पण यांनाच शासनाकडुन साधे ओळखपत्र मिळत नसल्याने अखेर दि १३ फेब्रुवारी रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातुर यांना निवेदनाद्वारे युवा नेते भाजपा विद्यार्थी परिषद लातूर ग्रामीण तालुका उपाध्यक्ष विशाल कणसे यांनी मागणी केली होती अखेर या मागणीकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन जिल्हा परिषदने पंचायत समिती कडे संबंधित सर्व लोकप्रतिनिधी यांना ओळखपत्र देण्यात यावे यासाठी नुकतेच पत्राद्वारे आदेश दिल्याने परिसरातील सर्व ग्रामपंचायत सदस्य व नागरिकात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

जेष्ठ कवी रामदास पवार काळाच्या पडद्याआड

गुहागर :- गुहागर तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते, सुप्रसिद्ध कवी, गीतकार, संगीतकार, पंचशील गायन पार्टीचे संस्थापक, जेष्ठ विचारवंत बौद्धजन सहकारी संघ, शाखा क्र. १८ मु. गाव तळवलीचे जेष्ठ सभासद, माजी खजिनदार, निवृत्त मुख्याध्यापक रामदास पवार यांच हृदयविकाराच्या झटक्याने नुकतच दुःखद निधन झाले. कालकथित रामदास पवार हे हसतमुख, सर्वसमावेशक, मनमिळाऊ व प्रेमळ स्वभावाचे, बुद्धिजीवी व्यक्तिमत्व होते, सिद्धहस्त लेखणीच्या जोरावर समाजात व जनमानसात त्यांनी स्वतःचा असा वेगळा ठसा उमटवला होता. कालकथित रामदास पवार यांच्या अंत्यदर्शनासाठी गाव व मुंबईतील अनेक कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली होती, त्यांच्या अचानक जाण्याने समाजातील सर्वच स्तरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. कालकथित रामदास पवार यांचा जलदानविधी, पुण्यानुमोदन व शोकसभेचा कार्यक्रम दि. २४ मार्च २०२४ रोजी मुक्काम गाव तळवली, ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी येथे बौद्धजन सहकारी संघ, शाखा क्र. १८ च्या अधिपत्याखाली निलेश दामोदर पवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे तरी कालकथित रामदास पवार यांच्या सहवासात असणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांनी, स्नेही, आप्तस्वकीय, मित्रपरिवार व साहित्य, लेखन, संगीत क्षेत्रातील रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आदर्शांस श्रद्धांजली अर्पण करावी असे आवाहन बौद्धजन सहकारी संघ, शाखा क्र. १८ तळवली व पंचशील गायन पार्टी यांच्या वतीने काढण्यात आलेल्या परिपत्रकात करण्यात आली आहे.

मिठाचे ‘हे’ पर्याय उच्च रक्तदाब ४० टक्क्यांनी करतील कमी? जाणून घ्या कोणी सेवन करावे, कोणी नाही?

मीठ हा आहारातील एक अविभाज्य घटक आहे. मिठामुळे अन्नाची चव वाढत असल्याने बहुतेक पदार्थांमध्ये ते वापरले जाते. त्याशिवाय शरीरालाही योग्य प्रमाणातील मिठाची आवश्यकता असते. पण, मीठ कितीही चांगले असले तरी त्याचे प्रमाणापेक्षा जास्त सेवन करणे आपल्या आरोग्यासाठी घातक असते. परंतु, एका संशोधनात मिठासाठी असलेल्या विविध पर्यायांच्या सेवनाने उच्च रक्तदाबाचा त्रास नियंत्रणात ठेवण्यास मदत होत असल्याचे समोर आले आहे. चीनच्या शास्त्रज्ञांनी केलेल्या अलीकडील अभ्यासात असे आढळून आले आहे की, मिठाच्या जागी त्याला असलेल्या पर्यायांचा वापर केल्यास हायपोटेन्शन (कमी रक्तदाब)चे प्रमाण न वाढता, उच्च रक्तदाबाचे प्रमाण ४० टक्क्यांनी कमी होत आहे.मिठाच्या पर्यायांमध्ये २५ टक्के पोटॅशियम क्लोराईड असते, जे रक्तदाबाचे प्रमाण वाढवत नाही. १२ टक्के सुकवलेले खाद्यपदार्थ जसे की, मशरूम, लिंबू, सीव्हीड, हॉथॉर्न व वाइल्ड जुजुब.या निष्कर्षांचे स्पष्टीकरण देताना द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना नवी दिल्लीतील इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल्सच्या वरिष्ठ सल्लागार, कार्डियाक इलेक्ट्रो फिजिओलॉजिस्ट व इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. वनिता अरोरा म्हणाल्या की, मिठाला असलेले अनेक पर्याय आहारातील सोडियम कमी करू शकतात; परंतु तेदेखील माफक प्रमाणात वापरणे आवश्यक आहे.मिठाला काय पर्याय आहेत आणि ते सामान्य मिठापेक्षा कसे वेगळे आहेत?मिठाला पर्याय म्हणजे विविध प्रकारचे मसाले. तुम्ही रोजच्या जेवणात मिठाऐवजी विविध प्रकारचे मसाले वापरू शकता. सर्वांत सामान्य चव पर्याय म्हणजे पोटॅशियम क्लोराईड. पण काही ब्रॅण्ड त्याऐवजी पोटॅशियम बायकार्बोनेट, पोटॅशियम सायट्रेट किंवा पोटॅशियम लॅक्टेट वापरतात. सोडियम रक्ताचे प्रमाण आणि रक्तदाब वाढवते; तर पोटॅशियम रक्तदाब कमी करण्यास आणि नियंत्रित करण्यास मदत करते. त्यामुळे सोडियम हायपरटेन्सिव्ह प्रभाव रोखते किंवा प्रतिकार करते. औषधी वनस्पती, मसाले, लसूण व लिंबूवर्गीय फळे यांसारख्या घटकांचा वापर करून मिठाला काही नवीन प्रकारचे पर्याय उपलब्ध केले जात आहेत. उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी मीठ प्रभावी ठरते? त्यात काही जोखीम घटक आहेत का?होय. अभ्यासातून दर्शविण्यात आले की, सोडियमचे सेवन कमी केल्याने आणि त्याच वेळी पोटॅशियमचे सेवन वाढल्याने उच्च रक्तदाब प्रभावीपणे कमी होतो. विशेषत: सोडियम संवेदनशील असलेल्या लोकांसाठी हे फायदेशीर आहे.परंतु मूत्रपिंडाशी संबंधित आजारांनी ग्रस्त असलेल्या किंवा विशिष्ट प्रकारची औषधे घेत असलेल्या लोकांसाठी मीठ फायदेशीर ठरू शकत नाही. कारण- जास्त पोटॅशियम त्यांच्यासाठी धोकादायक असू शकते. त्याशिवाय उच्च रक्तदाब व्यवस्थापन योजनेचा एक भाग म्हणून मिठाचे सेवन करणाऱ्या व्यक्तीने व्यायाम करणे, वजन कमी करणे व संतुलित आहार घेणे यांसारख्या जीवनशैलीतील बदलांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. पण, प्रत्येक व्यक्तीनुसार याचे परिणाम भिन्न असतात. म्हणून आहारात मिठाच्या पर्यायांचा समावेश करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.मिठाचे सेवन कोणी करावे? कोणी करू नये?उच्च रक्तदाब असलेल्या सुमारे ७५ टक्के व्यक्ती म्हणजे सोडियम-संवेदनशील व्यक्ती ५५ वयापेक्षा जास्त आहेत. उच्च रक्तदाबाचा कौटुंबिक इतिहास असलेल्या ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींना उच्च रक्तदाब होण्याची शक्यता कमी करण्यासाठी मिठाचे सेवन हा चांगला पर्याय असू शकतो. वयोवृद्ध (वय ६५+) हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधीची अनारोग्य परिस्थिती टाळण्यासाठी त्यांचा वापर करू शकतात.निरोगी आणि पौगंडावस्थेतील मुलांनी मिठाच्या विविध पर्यायांचा वापर करणे आवश्यक नसते किंवा त्यांची शिफारसदेखील केली जात नाही. कारण- त्यांना वाढ आणि विकासासाठी मिठाची आवश्यकता असते. तसेच सामान्य रक्तदाब असलेल्या लोकांना पर्याय निवडण्याची आवश्यकता नाही. सार्वजनिक आरोग्य मार्गदर्शक तत्त्वांनुसार, निरोगी प्रौढ व्यक्तीसाठी डब्ल्यूएचओने शिफारस केल्यानुसार एका व्यक्तीने दररोज पाच ग्रॅम म्हणजे फक्त एका चमचा इतके मीठ वापरणे आरोग्याच्या दृष्टीने योग्य आहे. त्यापेक्षा जास्त मीठ शरीरासाठी धोकादायक ठरते.हायपर टेन्शनचा त्रास असल्यास रक्तदाबावर नियंत्रण ठेवण्यासाठी मिठाच्या पर्यायाचे सेवन सुरू करावे का?हायपर टेन्शनचा त्रास असलेल्या व्यक्तीने डॉक्टरांशी सल्ला न घेता, स्वतःच्या मनाने मिठाला असलेल्या विविध पर्यायांचे सेवन करणे चुकीचे आहे.

लातूर जिल्ह्यात ध्वनिक्षेपक वापरावर निर्बंध लागू

लातूर, दि. १९ : जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. भारत निवडणूक आयोगास भारतीय राज्यघटनेचे कलम ३२४ खाली प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून निवडणुका विना अडथला व शांततेत पार पडण्सासाठी निवडणुकीच्या काळात ध्वनीक्षेपक (लाउडस्पीकर) वापरावर आयोगाने प्रतिबंध आणले आहेत. त्यामुळे निवडणूक काळात लातूर जिल्ह्यात ध्वनीक्षेपक वापरावर निर्बंध घालण्यात आले असून त्याविषयीचा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी निर्गमित केला आहे.कोणत्याही वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून त्याचा वापर फक्त सकाळी ६ वाजलेपासून ते रात्री १० वाजेपर्यंत संबंधित पोलीस अधिकारी यांची रीतसर परवानगी घेवून करता येईल. असा वापर करत असताना वाहन चालू ठेवून ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. सर्व प्रकारच्या ध्वनीक्षेपकांच्या वापरास वाहनावर बसवून किंवा अन्य प्रकारे दररोज सकाळी ६ वाजलेपासून ते रात्री १० वाजेपर्यंत परवानगी राहील. सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी अथवा निवडणुकीचे उमेदवार किंवा ध्वनीक्षेपकांचा वापर वाहन्वर बसवून किंवा अन्य प्रकारे करणाऱ्या लोकांनी ध्वनीक्षेपकाच्या वापराचे परवानगी विवरण मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी व जवळच्या पोलीस स्टेशनला देणे बंधनकारक राहील, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी निर्मीत केलेल्या आदेशात म्हटले आहे.तसेच या आदेशाचा कोणीही कोणत्याही प्रकारे भंग केल्यास ती व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र होईल. हे आदेश लातूर जिल्ह्यातील सर्व लोकसभा मतदारसंघांच्या हद्दीत १० मे २०२४ पर्यंत अंमलात राहतील, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे

आदर्श आचारसंहिता काळात शासकीय कार्यालयांच्या परिसरात उपोषण, मोर्चा, निदर्शने, घेराव करण्यास मनाई

लातूर, दि. १९ : भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च २०२४ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ या निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार लातूर जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून या काळात जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांच्या परिसरात उपोषण, मोर्चा, निदर्शने, घेराव आणि आंदोलने करण्यास मनाई करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी निर्गमित केले आहेत.

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या या आदेशानुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालयाच्या परिसरात तसेच जिल्ह्यातील इतर सर्व शासकीय व सर्व निमशासकीय कार्यालयाच्या परिसरामध्ये उपोषण, मोर्चा, निदर्शने, घेराव, आंदोलने इत्यादी आंदोलनात्मक कृतीला मनाई करण्यात आली आहे. हे आदेश १० मे, २०२४ पर्यंत अंमलात राहतील. प्रत्येक व्यक्तीला हे आदेश तामील करणे शक्य नसल्यामुळे हे एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकावर पोलिसांनी जाहीर करुन त्यास प्रसिध्दी द्यावी, असेही या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

निवडणूक प्रचाराच्या वाहनांवर पक्ष, कापडी फलक व झेंडे लावण्यास प्रतिबंध

धाराशिव,दि.१९(जिमाका): भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च २०२४ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. तेंव्हापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. जिल्ह्यातील लोकसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोणातून निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचे कापडी फलक, झेंडे लावणे इत्यादी बाबींसाठी काही बंधने घातली आहे. त्यामुळे जिल्ह्यात फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रिन ग्लॉसच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून २ फुट उंचीपेक्षा जास्त राहणार नाही.

निवडणूक कालावधीमध्ये जात, धर्म, भाषावार शिबिरांच्या आयोजनावर निर्बंध

लातूर, दि. १९ : जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाली असून या काळात कसल्याही प्रकारचे जात, भार्षा, धार्मिक शिबिरांचे, मेळाव्यांच्या आयोजनावर निर्बंध घालण्यात आले आहेत. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी निर्गमित केले आहेत. लोकसभा निवडणूकीची प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये लागू केलेले हे आदेश १० मे २०२४ पर्यंत लागू राहणार असल्याचे या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

निवडणूक काळात परवाना दिलेली शस्त्रास्त्रे वाहून नेण्यास मनाई

लातूर, दि. १९ : भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यापासून निकाल घोषित होईपर्यंत परवाना दिलेली शस्त्रास्त्रे वाहून नेण्यावर भारत निवडणूक आयोगाच्या ८ जून २०२३ रोजीच्या पत्रातील निर्देशानुसार निर्बंध लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी लातूर जिल्ह्यात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून जिल्ह्यातील शासकीय कर्तव्ये पार पडणाऱ्या व्यक्ती, दंडाधिकारी शक्ती प्रदान केलेले अधिकारी आणि कर्मचारी, बँकेच्या सुरक्षा व्यवस्थेवरील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त सर्व परवाना धारक व्यक्तींना परवाना दिलेली शस्त्रास्त्रे वाहून नेण्यावर बंदी घातली आहे. हे आदेश १० मे २०२४ पर्यंत अंमलात राहणार आहेत, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

निरोगी आणि आनंदी राहण्यासाठी ‘या’ योगासनांचा दररोज करा सराव, ताण-तणावापासून मिळेल आराम

रोजचे धावपळीचे जीवन, ऑफिसला जाण्याची गडबड, कामाचा ताण-तणाव इत्यादी कारणांमुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. शिवाय, यासोबतच चिडचिडेपणा आणि मन उदास होणे, इत्यादी समस्या उद्भवतात. या सर्व गोष्टींमुळे आयुष्यातून आनंद हरवून जातो. मग, अशा परिस्थितीमध्ये मन सतत उदास राहते, चिंता आणि ताण-तणाव वाढतो. काही जण तर हसणे देखील विसरून जातात.आनंद हा प्रत्येकाच्या आयुष्यात असणे, फार महत्वाचे आहे, जर हा आनंद नसेल तर मग माणसाचे आयुष्य व्यर्थ आहे. जगभरात २० मार्च हा दिवस ’आंतरराष्ट्रीय आनंद दिन’ म्हणून साजरा केला जातो.या आंतरराष्ट्रीय आनंद दिवसाच्या निमित्ताने आज आपण आनंदी राहण्यासाठी फायदेशीर असणाऱ्या काही योगासनांबद्दल जाणून घेणार आहोत. या योगासनांचा नियमितपणे सराव केल्यामुळे मन शांत, चिंतामुक्त आणि आनंदी राहण्यास मदत होते. चला तर मग जाणून घेऊयात मन आनंदी ठेवणाऱ्या या योगासनांबद्दल.बालासन बालासन या योगासनाला चाईल्ड पोझ म्हणून ही ओळखले जाते. या योगासनाचा नियमितपणे सराव केल्याने मानसिक आणि शारिरीक आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते. शिवाय, आपले शरीर लवचिक बनते. बालासनाचा सराव केल्याने ताण-तणाव, चिंता, निद्रानाश इत्यादी समस्या दूर होतात. मानसिक शांतीसाठी आणि आनंदी राहण्यासाठी हे योगासन अतिशय फायदेशीर आहे.हे योगासन करण्यासाठी सर्वात आधी योगा मॅटवर वज्रासनाच्या स्थितीमध्ये सरळ बसा. त्यानंतर, दीर्घ श्वास घेताना तुमचे दोन्ही हात डोक्याच्या वर सरळ करा. आता श्वास सोडा आणि खाली वाका. आता तुमच्या दोन्ही हातांचे तळवे आणि डोके जमिनीवर ठेवून एक दीर्घ श्वास घ्या आणि सोडा. तुमच्या हातांची बोटे एकमेकांना जोडून दोन्ही तळहातांच्या मधोमध तुमचे डोके ठेवा. आता तुम्हाला शरीरात ताण जाणवेल. आता पुन्हा सामान्य स्थितीमध्ये या. वज्रासन वज्रासन हे योगासन मानसिक शांतीसाठी आणि मूड सुधारण्यासाठी अतिशय फायदेशीर मानले जाते. वज्रासनाचा नियमित सराव केल्याने पोटाच्या समस्या आणि आळस दूर होण्यास मदत होते.हे योगासन करण्यासाठी सर्वात आधी योगा मॅटवर सरळ बसा. आता तुमचे दोन्ही गुडघे वाकवून ताठ बसा. या स्थितीमध्ये तुमचे दोन्ही हात बाजूला ठेवा आणि दोन्ही पायांच्या टाचांवर तुमचे नितंब ठेवा. पाठीचा कणा ताठ ठेवा आणि सरळ रेषेत पाहा. या स्थितीमध्ये तुम्हाला शरिरात ताण जाणवेल. त्यानंतर, पुन्हा सामान्य स्थितीमध्ये या.

नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी येणाऱ्या व्यक्तींबाबत आदेश निर्गमित

लातूर, दि. १९ : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार ४१-लातूर (अ.जा.) लोकसभा मतदारसंघ निवडणूक अधिकारी कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी येणाऱ्या व्यक्तींसाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशानुसार उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी अधिकारी यांच्या कार्यालयात येणाऱ्या वाहनांच्या ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या, वाहने यांचा नसावा. तसेच नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात पाच व्यक्ती उपस्थित राहतील. या व्यतिरिक्त कोणालाही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात, तसेच दालनात प्रवेश दिला जाणार नाही. निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. १० मे २०२४ पर्यंत हे आदेश लागू राहणार आहेत, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

चारा टंचाईतही पशुधनाची जोपासना; पशुपालकांचे जिल्हाधिकाऱ्यांकडून कौतुक

लातूर/प्रतिनिधी:श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त आयोजित पशु प्रदर्शनास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. या प्रदर्शनात सहभागी झालेले उत्कृष्ट पशु पाहून या पशुंचे चारा टंचाईच्या काळातही उत्कृष्ट पालन-पोषण करणाऱ्या पशुपालकांचे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी कौतुक केले. यात्रा महोत्सवानिमित्त जिल्हा परिषदेचा पशुसंवर्धन विभाग,लातूर पंचायत समिती व श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.१९)पशुपक्षी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.या पशुप्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते संपन्न झाले.याप्रसंगी तहसीलदार सौदागर तांदळे,देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर,व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे,ओम गोपे,बच्चेसाहेब देशमुख, यांच्यासह पंचायत समिती व पशुवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांकडून चारा टंचाईची माहिती घेतली.यावर्षी पर्जन्यमान कमी असल्याने चारा टंचाई जाणवण्याची शक्यता आहे.अशा स्थितीतही पशुपालक नेटाने पशुंची जोपासना करीत असल्याबद्दल त्यांनी पशुपालकांचे कौतुक केले. या प्रदर्शनात देवणी नर एक वर्षाखालील वासरे गट,देवणी नर एक वर्षावरील वासरे गट,देवणी नर दोन दात वळू गट,देवणी नर चार दात वळू गट,देवणी नर सहा दात वळू गट तसेच देवणी मादी गटातून देवणी मादी एक वर्षाखालील वासरे गट,देवणी कालवड एक वर्षावरील गट,देवणी गाभण कालवड गट,देवणी गाभण गाय गट,देवणी गाय दुधाळ गट तर लालकंधारी नर गटातून लालकंधारी नर एक वर्षाखालील वासरे गट, लालकंधारी नर एक वर्षावरील वासरे गट,लालकंधारी नर दोन दात वळू गट,लालकंधारी नर चार दात वळु गट,लालकंधारी नर सहा दात वळू गट,लालकंधारी मादी गटातून लालकंधारी मादी एक वर्षा खालील वासरे गट,लालकंधारी कालवड एक वर्षावरील गट,लालकंधारी गाभण कालवड गट,लालकंधारी गाभण गाय गट,लालकंधारी गाय दुधाळ गट,संकरित मादी गटातून संकरित मादी एक वर्षा खालील वासरे गट, संकरित कालवड एक वर्षावरील गट,संकरित गाभण गाय गट,संकरित गाय दुधाळ गट तर म्हैस गटातून नर व मादी अशा दोन गटातील जवळपास दिडशे पशु या प्रदर्शनात सहभागी झाले होते. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवड समितीने प्रदर्शनातील उत्कृष्ट पशुंची निवड केली. प्रत्येक गटातील पशुधनास प्रथम,द्वितीय तृतीय तसेच अ,ब,क,ड याप्रमाणे बक्षिसांचे वाटप करण्यात आले.बक्षिसाची रक्कम आरटीजीएसद्वारे संबंधित पशुपालकाच्या खात्यावर वर्ग करण्यात आली.

कठोर परिश्रम व योग्य नियोजनातून यशाची भरारी घेणे सहज शक्य विद्यार्थी पालक मेळावा : प्राचार्य गोविंद शिंदे यांचे प्रतिपादन

लातूर दि.१९-०३-२०२४ इयत्ता ९ वी मधून १० च्या वर्गामध्ये पदार्पण करणार्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा घेण्यात आलेला आहे. या मेळाव्यातून उन्हाळी वर्गाचे नियोजन, मागील वर्षाची यशस्वी परंपरा, चालू वर्षाचे नियोजन आणि त्याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने करणे गरजेचे आहे. अशा पध्दतीने कठोर परिश्रम व योग्य नियोजनातून दैदिप्यमान यशाची भरारी घेणे सहज शक्य होईल असे प्रतिपादन स्वामी विवेकानंद विद्यालयाचे प्राचार्य गोविंद शिंदे यांनी केले.यावेळी ते जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद विद्यालयात आयोजित इयत्ता ९ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालक मेळाव्यात बोलत होते. यावेळी प्राचार्य मारुती सूर्यवंशी, उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत, उपमुख्याध्यापक अनिल सोमवंशी आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी प्राचार्य मारुती सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांचे वर्तन, शिस्त आणि पालकांच्या जबाबदार्या याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले तर प्राचार्य गोविंद शिंदे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांसाठी १० वी च्या उन्हाळी क्लासेसच्या माध्यमातून करण्यात आलेले नियोजन, नियोजनातून करण्यात आलेली अंमलबजावणी आणि सहशालेय उपक्रम यातून येणारा निकाल, याबाबत पॉवर पॉईंट प्रझेंटेशनच्या माध्यमातून विद्यार्थी व पालकांना सविस्तर मार्गदर्शन केले.यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत यांनी केले. पालक मेळाव्याचे सुत्रसंचालन अब्दूल गालिब शेख यांनी केले तर आभार विनोद सूर्यवंशी यांनी मानले. या पालक मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी व्यंकट कांबळे, संगादेव आवस्कर, विनोद सूर्यवंशी, राधा कवरे, गणेश कदम, बाळाराम पिचारे, अरूण काळे, भगतसिंग आर्य, भगवंत कलेढले, शेख अफसर, प्रशांत कांबळे, भागवत ढोक, सूरज सोनटक्के यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी परिश्रम घेतले. यावेळी या पालक मेळाव्याला विद्यार्थी व पालकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सी-व्हिजील कक्षाच्या कामकाजाचा घेतला आढावा

लातूर, दि. १९ : भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ कार्यक्रमानुसार जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या काळात आदर्श आचारसंहिता भंगाच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी सी-व्हिजील मोबाईल पची सुविधा भारत निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिली आहे. यासाठी लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यान्वित करण्यात आलेल्या कक्षाला जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी भेट देवून येथील कामकाजाचा आढावा घेतला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा आदर्श आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी अनमोल सागर, प्रभारी अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त बालाजी मरे यांची यावेळी उपस्थिती होती.आदर्श आचारसंहितेचा भंग होत असल्यास त्या प्रसंगाचे पमध्ये छायाचित्र अथवा व्हीडीओ काढून तक्रार नोंदविता येणार आहे. त्यावर जिल्हास्तरीय कक्षातून त्वरित कार्यवाही केली जाणार आहे. सी व्हिजील पवर प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तातडीने दखल घेवून त्याचा निपटारा केला जाणार असून यासाठी विविध अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. या सर्व कामकाजाचा आढावा जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी घेतला. तसेच सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी आपली जबाबदारी अचूकपणे आणि विहित कालावधीत पार पाडावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

ग्राहक पंचायतीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सौ.कौशल्या मंदाडे

लातूर/प्रतिनिधी: अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या लातूर जिल्हा उपाध्यक्षपदी सौ.कौशल्या मंदाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे देवगिरी प्रांत प्रमुख डॉ.विलास मोरे यांनी ही निवड केली असून सौ.मंदाडे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले आहे.सौ. मंदाडे या ग्राहक पंचायतीच्या कार्यकर्त्या असून अनेक वर्षांपासून सक्रिय आहेत.त्यांनी आजपर्यंत केलेल्या कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे.जिल्हा उपाध्यक्षपदी काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील यांच्यासह एन.जी.माळी,महेश ढवळे, इस्माईल शेख,धनराज जाधव,मोहन माळी,माधव गुंडरे,बळवंत कागले, किशन वडारे,संगमेश्वर रासुरे,पार्वती सोमवंशी, सुवर्णा भोसले,माधव भांडे,शिवराज शेकडे,सीमा देशमुख,अश्विनी बने,अलका मगर,संगीता कोटवादे यांनी सौ.कौशल्या मंदाडे यांचे अभिनंदन केले आहे.

श्रम आणि श्रमिकांचा सन्मान केला पाहिजे :अजितभैय्या पाटील कव्हेकर

लातूर(प्रतिनिधी)दि.भारताला महासत्ता बनवायचे असेल तर आपण सर्वांनी श्रम संस्कृतीची जोपासना करत श्रम आणि श्रमिकांचा सन्मान केला पाहिजे तरच खऱ्या अर्थाने आपल्या देशाचा विकास जलद साधता येईल असे प्रतिपादन युवा नेते अजितभैय्या पाटील कव्हेकर यांनी केले. श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था,लातूर द्वारा संचलित करियर कट्टा,महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,लातूर व विश्वकल्याण विचार मंच,लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजकता विकास कार्यसत्र. एक कदम उद्यमी भारत की और या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ संजय गवई,मुख्य वक्ता डॉ हरिप्रसाद सोमानी,उपप्राचार्य प्रो डॉ राजकुमार लखादिवे,विश्व कल्याण विचार मंचचे अध्यक्ष धनंजय सूर्यवंशी,करियर कट्टा समन्वयक डॉ शिवप्रसाद डोंगरे आणि डॉ मनोहर चपळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पुढे बोलताना अजितभैय्या पाटील कव्हेकर म्हणाले की,आपण आपल्या शिक्षणाचा उपयोग स्थानिक पातळीवरील लोकांना कसा होईल याचा सातत्याने विचार केला पाहिजे. तसेच अभ्यासामध्ये सातत्य, विश्लेषणशिलता आकलन क्षमता आणि वर्तमान स्थितीचे भान या गोष्टीकडे आपण विशेष लक्ष दिले पाहिजे असेही ते म्हणाले प्रास्ताविक करताना उपप्राचार्य डॉ राजकुमार लखादिवे म्हणाले की,युवकांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योजक व्हावे आणि त्यामध्ये उज्वल यश संपादन करावे असेही ते म्हणाले. यावेळी धनंजय सूर्यवंशी म्हणाले की,युवकांमधील सामर्थ्य भारताला संपूर्ण विश्वात नवीन ओळख मिळवून देऊ शकते. जीवनाचा दृष्टिकोन आणि देशाप्रती असलेली अस्मिता युवकांनी ओळखणे गरजेचे आहे. प्रमुख वक्ता डॉ हरिप्रसाद सोमानी म्हणले की,आपणास उद्योगात यश संपादन करावयाचे असेल तर नियोजन महत्त्वाचे असते. आपण अंत:करणातून कार्य करण्याची प्रेरणा स्वतःमध्ये निर्माण केली गेली पाहिजे.कार्य करत असताना स्वतःमध्ये प्रेझेन्स ऑफ माईंड,कॉमन सेन्स असणे आवश्यक आहे.सुख,दु:ख, लाभ,हानी,जय आणि पराजय हा येतच असतो.आपण कधीच आपले मनोबल खचू देऊ नये किंवा कसल्याही प्रकारचा न्यूनगंड बाळगू नये या विषयी विविध उदाहरणाद्वारे त्यांनी स्पष्ट केले. आपल्या अध्यक्षीय समारोपामध्ये प्रभारी प्राचार्य डॉ संजय गवई म्हणले की,विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण असणे आवश्यक आहे.कष्ट आणि प्रात्यक्षिक ज्ञानानेच आपली प्रगती होणे शक्य असल्याचे प्रतिपादन याप्रसंगी त्यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ राहुल डोंबे यांनी केले तर आभार डॉ मनोहर चपळे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी डॉ सोमेश्वर पंचाक्षरी,कार्यालय प्रमुख नामदेव बेंद्रगे,नंदू काजापुरे,बालाजी डावकरे,शुभम बिराजदार,बालाजी होनराव,कृष्णा कोळी,रंगनाथ लांडगे आणि संतोष येचेवाड यांनी परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील वाणिज्य,समाजकार्य आणि संगणक शास्त्र विभागाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

हास्य क्लबचे सदस्य लालासाहेब निर्मल यांचा वाढदिवस साजरा

हास्य क्लबचे सर्व सदस्य उपस्थित होते.

लातूर :- लातूर येथील नाना - नानी पार्क हास्य क्लबचे मनमिळावू स्वभावाचे सदस्य असलेले लालासाहेब निर्मल यांचा वाढदिवस अतिशय आनंदाने व उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी हास्य क्लबचे रमेश मुळे , गोविंद कुंचमवार, सुभाष आप्पा,माशाळकर यांनी लालासाहेब निर्मल यांना शाल, फेटा,हार, घालून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिले या वाढदिवसाला

निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात आदर्श आचारसंहिता नियंत्रण कक्ष कार्यान्वित

लातूर, दि. १९ : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ४१- लातूर (अ.जा.) लोकसभा मतदार संघात १६ मार्च २०२४ पासून आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी सुरु झाली आहे. याअनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात आदर्श आचारसंहिता विषयक नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून हा कक्ष २४ तास सुरु राहणार आहे. लातूर जिल्ह्यात तसेच लोकसभा मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रात आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास नागरिकांनी नियंत्रण कक्षाच्या ०२३८२-२२४४७७ या दूरध्वनी क्रमांकावर आपली तक्रार नोंदवावी, असे आवाहन ४१- लातूर (अ.जा.) लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे. हा नियंत्रण कक्ष २४ तास कार्यान्वित राहणार असून या कक्षात नियुक्त करण्यात आलेले कर्मचारी दूरध्वनीद्वारे प्राप्त तक्रारींची दखल घेवून पुढील आवश्यक कार्यवाही करतील. तसेच निवडणुकीसंदर्भात मदत हवी असल्यास ०२३८२-२२४४७७ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा १९५० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

थकबाकी वसुलीसाठी ठोकले सील एमआयडीसी परिसरातील मालमत्तेवर मनपाची कारवाई



लातूर/प्रतिनिधी:- कराची थकबाकी न भरणाऱ्या आस्था संकुल या आस्थापनेस मनपाच्या पथकाने सोमवारी (दि.१८ मार्च)सील ठोकले.

एमआयडीसी परिसरातील सहा - ६- १६२ या ठिकाणी असणाऱ्या आयटी पार्क मध्ये आस्था संकुल आहे. येथे केशवराज ज्युनिअर कॉलेज चालवले जाते.या मालमत्ता धारकाकडे १३ लाख ९ हजार ८२१ रुपये कर थकलेला आहे. नोटीसा देऊनही कर भरणा करण्यात न आल्याने मनपाच्या पथकाने केशवराज ज्युनिअर कॉलेजचे कार्यालय सोमवारी सील केले.

मनपाचे पथक प्रमुख समाधान सूर्यवंशी, कर निरीक्षक प्रदीप जोगदंड,जे.एम. ताकपिरे,सहाय्यक पथक प्रमुख चंद्रकांत बावगे, वसुली लिपीक संतोष फीसके, संतोष कुरकुट आदींनी या कारवाईत सहभागी घेतला. आणखी एका कारवाईत मनपाचे पथक सील लावण्यास गेले असता संबंधित मालमत्ता धारकाने थकीत करापोटी ७ लाख रुपयांचा धनादेश मनपाच्या पथकाकडे सुपूर्द केला.

ज्या मालमत्ता धारकांकडे कर थकलेला आहे अशांनी आपला थकीत कर लवकरात लवकर भरून सहकार्य करावे.जप्तीची / मालमत्ता सिल करण्याची कारवाई टाळावी,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT
No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR
TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE